# पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.


**प्रेसनोट**

# पीएमपीएमएल च्या स्वारगेट बस स्थानकाची पीएमपीएमएल व महामेट्रो च्या अधिकाऱ्यांकडून संयुक्त पाहणी

पीएमपीएमएल च्या स्वारगेट बस स्थानकाहून ये-जा करणाऱ्या प्रवाशांची गैरसोय होवू नये, बसेसचे संचलन सुरळीत व्हावे व बस संचलनात येणाऱ्या अडचणींचे निराकरण करणेसाठी आज सोमवार दि. २८/१०/२०२४ रोजी पीएमपीएमएल च्या अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा. श्रीमती दिपा मुधोळ-मुंडे व महामेट्रोचे सिस्टिम इंजिनिअर श्री. अपूर्व जिंदाल, प्रोजेक्ट मॅनेजर श्री. गोविंद कदम, महामेट्रोचे सल्लागार श्री. दत्तात्रय माने यांनी पीएमपीएमएल च्या स्वारगेट बस स्थानकाची संयुक्तपणे पाहणी केली. या संयुक्त पाहणी पथकात पीएमपीएमएल चे चिफ ट्रान्सपोर्ट मॅनेजर (ऑपरेशन) श्री. सतिश गव्हाणे, मुख्यालय क्र. १ चे प्रमुख श्री. समीर आत्तार व स्वारगेट बस स्थानकावरील कर्तव्यास असणारे कर्मचारी यांचाही समावेश होता.

पीएमपीएमएल च्या अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा. श्रीमती दिपा मुधोळ-मुंडे यांनी सदर पाहणीवेळी स्वारगेट बस स्थानकावरून ये-जा करणाऱ्या बसेसच्या संचलनाचा आढावा घेतला व प्रवाशांना तसेच बस संचलनाकरीता येत असलेल्या अडचणींचे निराकरण करणेच्या दृष्टीने खालील सूचना दिल्या.

१) महामेट्रो कडून स्वारगेट येथील बसस्थानक नव्याने विकसित होईपर्यंत तात्पुरत्या स्वरूपात प्रवाशांची सोय व बस संचलनाकरीता महामेट्रोच्या प्रवेशद्वाराजवळ सलग पोलीस चौकीपर्यंत बसशेड उभारण्यात यावे.

२) स्वारगेट बस स्थानक आवारातील बस संचलनात सुरळीतपणा राहण्याच्या दृष्टीने स्वारगेट मेट्रो स्टेशनच्या प्रवेशद्वाराजवळ असलेले सर्व अतिक्रमण त्वरीत हटविण्यात यावे.

३) पीएमपीएमएल चे कर्मचारी व प्रवाशी यांचेकरीता स्वारगेट बस स्थानक आवारात स्वच्छतागृहाची सुविधा त्वरीत उपलब्ध करून देण्यात यावी.

पीएमपीएमएल व महामेट्रो या दोन्ही सेवा एकमेकांना पूरक असून प्रवाशांना विश्वासार्ह व दर्जेदार सेवा मिळणेच्या दृष्टीने पीएमपीएमएल व महामेट्रो च्या अधिकाऱ्यांनी संयुक्तपणे प्रयत्न करावेत अशा सूचना यावेळी पीएमपीएमएल च्या अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा. श्रीमती दिपा मुधोळ-मुंडे यांनी पीएमपीएमएल व महामेट्रो च्या अधिकाऱ्यांना दिल्या.

**Sd/-**
**चिफ ट्रान्सपोर्ट मॅनेजर (ऑपरेशन)**
**पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.**

---

दि.२८/१०/२०२४

मा. संपादक,
दैनिक ...........
यांजकडेस...

महोदय,

वरील प्रेसनोट नागरिकांच्या माहितीसाठी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिद्ध होणेविषयी विनंती आहे.
मा. स. कळावे

**Sd/-**
**कामगार व जनता संपर्क अधिकारी**
**पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.**